MHNS160000512024

**कौ.हिं.म.सं.अ. अर्ज क्रं.०४/२०२४ नि. क्रं.०४ खालील आदेश**
**दिनांक २९/०४/२०२६**

**०१.** प्रस्तुतचा अर्ज अर्जदाराने अंतरीम आर्थिक लाभ मिळण्यासाठी कौंटुबिक हिंसाचारापासुन महिलांचे संरक्षण अधिनियम, २००५ चे कलम २३ अन्वये दाखल केलेला आहे.

**अर्जदाराच्या अर्जातील कथन थोडक्यात खालीलप्रमाणे आहेः–**

**०२.** अर्जदार क्र. १ व गैरअर्जदार क्र. १ चा विवाह दि. १२/७/२००८ रोजी औदुंबर मंगल कार्यालय मेरी आडगांव लिंकरोड, गोरक्षनगर, दिंडोरीरोड पंचवटी नासिक येथे हिंन्दु धर्मशास्त्राप्रमाणे व समाजातील चालीरितीनुसार झालेला असुन सदर लग्नाचा संपुर्ण खर्च अर्जदाराचे आईने केलेला असुन गैरअर्जदार यांचे मागणी व सांगणेप्रमाणे लग्न थाटामाटात करून त्यासाठी ५ ते ६ लाख रूपये खर्च केलेला आहे सदर लग्नसंबधातुन उभयतांना एक मुलगा अर्जदार क्र. २ आरूष हा झालेला असुन उभयतामधील पती पत्नीचे नातेसंबध आजही कायम आहेत. यातील गैरअर्जदार क्र. २ व ३ हे अर्जदाराचे सासु सासरे असुन गैरअर्जदार क्र. ४ हे दिर आहे, गैरअर्जदार क्र. ५ ही अर्जदाराची जाव आहे. लग्नानंतर अर्जदार ही गैरअर्जदारकडे नांदणेसाठी एकत्र कुंटूबात गेली. त्यावेळी गैरअर्जदार क्र. १ म्हणत असे की, माझ्या बहिणीला, भावाला व वहिणीला तु पसंत नव्हती परंतु मी माझ्या आईच्या व नातेवाईकाच्या सांगणेवरून मी तुझ्याशी लग्न केलेले आहे, कारण तु माझ्या मामाची मुलगी होती असे म्हणत असे. गैरअर्जदार क्र. १ हा अर्जदाराशी कधीही नीटपणे वागत नसे, तिची कोणतीही काळजी घेत नसे तसेच गैरअर्जदार क्र. १ हा गैरअर्जदार क्र. २ ते ५ यांचे ऐकुन

अर्जदारास शिवीगाळ व मारहाण करीत असे. अर्जदाराचे सासु सासरे गैरअर्जदार क्र. २ व ३ हे म्हणत असे की, तु आमचे घरातील लायकीची नाही, तुम्ही आमच्या बरोबरीचे नाही असे अपमानास्पद बोलुन अर्जदाराचा वेळोवेळी मानसिक व शारीरीक छळ करीत असे. तसेच अर्जदारास माहेरच्या लोकांबरोबर बोलू देत नसे, फोन करण्याची मनाई करीत व म्हणत असे की, शेजारी कुणाशी बोलायचे नाही, माहेरी जायचे नाही कुठेही बाहेर जायचे नाही तसेच आमची गाडी वापरायची नाही, तु जॉब करायचा नाही असे अनेक नियम अर्जदारावर गैरअर्जदार यांनी लावलेले होते. अर्जदाराचे माहेरची परीस्थिती गरीबीची असल्याने गैरअर्जदारचा सर्व त्रास सहन करून निमुटपणे नांदत होती असे कथन केले आहे.

**०३.** अर्जदाराने पुढे असे कथन केले आहे की, काही दिवसात सगळे ठिक होईल असा विचार करून अर्जदार ही गैरअर्जदारकडे नांदत होती. दरम्यान अर्जदार ही गैरअर्जदार क्र.१ पासुन गर्भवती राहिली व हे समजताच अर्जदाराच्या काही वैद्यकीय तपासणी केल्या असता, तिला थायराईड असल्याचे निष्पन्न झाले. डॉक्टरांनी वैद्यकीय उपचार घेवुन काळजी घेण्याचे सांगितले परंतु दवाखान्यात पैसे लागतील म्हणुन अर्जदारावर योग्य उपचार न करता अर्जदाराचे तब्येतीकडे गैरअर्जदारने दुर्लक्ष केले व गैरअर्जदारने अर्जदारास दवाखान्यात उपचारासाठी घेवून गेले नाही. त्यानंतर अर्जदारास नवव्या महिन्यात ताप आल्याने तिचे अंगावर काळ्या रंगाचे डाग आले म्हणुन अर्जदार ही स्वतः दवाखान्यात जावुन भरती झाली. परंतु त्यावेळी गैरअर्जदार हे कोणीही अर्जदारास पाहण्यास आले नाही. गैरअर्जदारने अर्जदाराचे आरोग्याकडे गरोदर काळात दुर्लक्ष केल्यामुळे तसेच गरोदर काळात अर्जदाराकडुन गैरअर्जदार हे सर्वजण कष्टाची कामे करून घेतल्यामुळे अर्जदाराचे बाळ पोटातच पोईझन झाल्याने ते दुर्दैवाने मयत झाले. त्यावेळी हॉस्पीटलचे बिल भरावे लागेल म्हणुन गैरअर्जदार दवाखान्यात आले नाही

अथवा अर्जदाराची कोणतीही विचारपुस केली नाही. याउलट अर्जदार हीच गैरअर्जदार क्र. १ यांस वांरवार फोन करून नांदणेस घेवुन जाणेसाठी विचारणा करीत होती परंतु कोणीही तिला घेणेस आले नाही त्यामुळे अर्जदार ही सुमारे तीन महिने माहेरी राहात होती. शेवटी नाईलाजाने गैरअर्जदारचे वागण्यात बदल होईल या आशेवर अर्जदार ही तिचे आईसोबत गैरअर्जदारकडे नांदणेस गेली. त्यानंतर सन २०१२ चे दरम्यान अर्जदार ही गैरअर्जदार क्र. १ पासुन दुस–यांदा गरोदर राहीली परंतु त्याही काळात गैरअर्जदार यांनी अर्जदाराची कोणतीही काळजी घेतली नाही. त्यानंतर दि.४/४/२०१३ रोजी अर्जदारास मुलगा झाला. परंतु त्याहीवेळी बाळंतपणाचा संपुर्ण खर्च अर्जदाराचे आईने केला. तसेच अर्जदारास मुलगा झाल्यानंतर कौटुंबिक खर्च वाढले परंतु गैरअर्जदार क्र. १ हा अर्जदार व मुलाचे दैनदिन खर्चासाठी कोणतेही पैसे देत नव्हता व त्यांचेकडे दुर्लक्ष करीत होता. त्यानंतर दि.३/१२/२०२३ रोजी अर्जदार ही मुलासह गैरअर्जदारकडे नांदणेस गेली असता, गैरअर्जदार यांनी अर्जदारास घरात घेतले नाही याउलट अर्जदाराचे अंगावरील सोन्याचे दागिणे अर्जदाराचे सासु व जाव यांनी काढुन घेवुन दमदाटी केली की, तु आमचे घरात कशाला आली, आली तशी निघुन जा, तुला आम्ही पोसायला रिकामे नाही, तु तुझ्या आईकडुन तुझ्या दैनदिन गरजा पुर्ण करणेसाठी व मुलाचे शिक्षणासाठी पैसे घेवुन ये, तुझ्या नव–याचे नांवावर मातोरी येथे शेती असुन तु मातोरीला निघुन जा, तु येथे पुन्हा आली तर तुझे हातपाय तोडू, तुझा मुडदा पाडू अशी जिवे मारण्याची धमकी देवुन गैरअर्जदार व त्याचे कुंटूबीयांनी अर्जदारास नांदविण्यास नकार दिला त्यामुळे अर्जदाराने नाईलाजास्तव सरकारवाडा पोलिस स्टेशनला एनसीआर क्र. ८९२/२०२३ अन्वये सासु, सासरे व दिर यांचे विरूध्द तक्रार दिली त्यानंतरही अर्जदाराने गैरअर्जदारकडे नांदणेसाठी प्रयत्न केले परंतु गैरअर्जदारने अर्जदारास नांदविले नाही. अर्जदार ही

तरूण असुन तिला संसार सुखाची गरज व आवड आहे व ती आजही गैरअर्जदार क्र. १ सोबत नांदण्यास तयार व उस्तुक होती व आहे सामनेवालेंनी अर्जदारास माहेरी हुसकावून दिल्यानंतर गैरअर्जदार अगर कोणीही नातेवाईक अर्जदारास घेण्यास आले नाही अगर विचारपुस केली नाही. सामनेवालेंनी अर्जदाराचा स्वतःहुन त्याग केला करून तिला संसारसुखापासुन वंचित केले आहे. त्यामुळे तिला माहेरी आईवडीलांकडे राहुन परावलंबी जीवन जगावे लागत आहे. तसेच अर्जदार ही माहेरी असल्यापासुन तिचे व मुलाचे अन्नवस्त्राची कोणतीही तरतुद गैरअर्जदारने केली नाही. अशाप्रकारे गैरअर्जदार यांचे वरील वर्तनामुळे अर्जदाराचे वैवाहिक जीवन उध्दवस्त झाले असुन गैरअर्जदार यांनी संगनमत करून अर्जदाराचा शारीरीक, मानसिक व कौटुंबिक हिसांचार केलेला आहे असे कथन केले आहे.

**०४.** अर्जदाराने पुढे असे कथन केले आहे की, अर्जदाराचे आईवडीलांची माहेरची परीस्थिती अत्यंत गरीबीची असुन तिला उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही, तिला कोणताही कामधंदा नाही अशा परीस्थितीत अर्जदार स्वतःचा व मुलाचा उदरनिर्वाह करणेस असमर्थ आहे परंतु गैरअर्जदारने अर्जदारांचे अन्नवस्त्राची काहीएक तरतुद न केल्याने अर्जदारांना उपाशीपोटी जीवन जगावे लागत आहे. याउलट गैरअर्जदारची मौजे मातोरी ता.जि. नासिक येथे बागायती शेतजमीन असुन त्यामध्ये द्राक्षबाग, गहु, भाजीपाला यासारखी नगदी पिके घेतात. सदर व्यवसायापासुन सदर १५ ते २० लाख रूपये वार्षिक उत्पन्न मिळत आहे. तसेच गैरअर्जदारचे एकत्र कुंटूबाचे सातपुर नासिक येथे साईरेखा मसाला वन या नांवाने हॉटेल व्यवसाय लॉजिंग आहे, तसेच रेशीमकाठी यानांवाने लॉन्स मंगल कार्यालय आहे तसेच पेट्रोलपंप भाडे कराराने दिलेले आहे या सर्व व्यवसायापासुन गैरअर्जदारस दरमहा रू ३० ते ४० लाख रूपये उत्पन्न मिळते गैरअर्जदारचा

रविवार कारंजा नासिक येथे पांडुरंग गोपाळ पवार किराणा यानांवाने व्यवसाय असुन त्यापासुन दरमहा रू २ ते ३ लाख रूपये उत्पन्न मिळते. गैरअर्जदारचे एकत्र कुंटूबाचे अशोकस्तंभ नासिक येथे बालाजी चाळ या नांवाने बिनशेती प्लॉट आहे. त्यामुळे गैरअर्जदारचे कुंटूबातील सर्व इसम कमविते असुन त्यांची आर्थिक परीस्थिती अत्यंत चांगली आहे गैरअर्जदारची अर्जदारांना अर्जात नमुद केल्याप्रमाणे प्रत्येकी रु २०,०००/– अक्षरी वीस हजार मात्र अन्नवस्त्र दरमहा देण्याची ऐपत आहे व त्याची ती कायदेशिर जबाबदारी आहे तसेच गैरअर्जदारवर अर्जदाराशिवाय अन्य कोणीही अवलंबुन नाही.

**०५.** अर्जदाराने पुढे असे कथन केले आहे की, अर्जदार ही गैरअर्जदार क्र. १ ची पत्नी असुन उभयतांचा वैवाहिक संबंध कायम आहे. त्यामुळे गैरअर्जदार क्र. १ बरोबर राहण्याचा तिला कायदेशिर हक्क आहे, परंतु गैरअर्जदार यांनी अर्जदारास वैवाहिक जिवनापासुन विनाकारण वंचित ठेवले आहे. अशा परीस्थितीत गैरअर्जदार यांनी अर्जदाराची खावटीची तजविज केली नाही, तिचे राहण्याची व्यवस्था केली नाही. याउलट तिचा शारीरीक मानसिक छळ केला व तिला तिचे घरातुन हुसकावून दिले व अर्जदाराचा सतत शारीरीक व मानसिक छळ करीत आहे, त्यामुळे सर्व गैरअर्जदार यांचेकडुन अर्जदारावर अत्याचार होत आहे असे कथन केले आहे. सामनेवालेंची अर्जदारास व मुलांस अन्नवस्त्र देणे ही कायदेशीर व नैतिक जबाबदारी आहे म्हणून अर्जदार यांनी प्रस्तुतचा कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम २००५ मधील तरतुदीप्रमाणे दाखल केला आहे व तो मंजूर करण्याची विनंती केली आहे.

**०६.** गैरअर्जदारांवर नोटीस बजावणी होवुन ते प्रकरणात हजर झाले व गैरअर्जदार यांनी त्यांचा जबाब दाखल केला. गैरअर्जदारांनी असे कथन केले आहे

की, अर्जदार व गैरअर्जदार क्र. १ यांचा विवाह दि.१२/०७/२००८ रोजी हिंदु धर्मशास्त्र व रितीरिवाजाप्रमाणे औदुंबर लॉन्स मंगल कार्यालय, गोरक्ष नगर, मेरी, मेरी–आडगांव लिंकरोड, दिंडोरी रोड, नाशिक येथे संपन्न झालेला आहे. अर्जदार या गैरअर्जदार क्र. १ यांचे सख्खे मामाची सर्वात मोठी मुलगी असल्याने ते दोघेही एकमेकांना व एकमेकांचे कुटूंबियांना लहानपणापासून ओळखतात. अर्जदार यांचे वडील म्हणजेच गैरअर्जदार क्र. १ यांचे मामा श्री. ज्ञानेश्वर किसन आहेर यांचे दिनांक ११/०६/२००४ रोजी निधन झालेले असल्याने तसेच त्यांना ३ मुली व १ लहान मुलगा असल्याने गैरअर्जदार क्र. १ यांचे वडिलांनी म्हणजेच गैरअर्जदार क्र. २ यांनी स्वतः पुढाकार घेऊन स्वखर्चाने अर्जदार व गैरअर्जदार क्र. १ यांचा विवाह सोहळा पार पाडला आहे असे कथन केले आहे.

**०७.** गैरअर्जदारांनी पुढे असे कथन केले आहे की, सदरील विवाह संबंधातून अर्जदार व गैरअर्जदार क्र. १ यांना दि. ०४/०४/२०१३ रोजी मुलगा नामे आरूष हा झालेला आहे. अर्जदार हिस गैरअर्जदार व त्यांचे कुटूंबियांची लहानपणापासूनच सर्वच माहिती होती त्यामुळे गैरअर्जदार क्र. १ हे शारिरीकदृष्ट्या सक्षम नसताना देखिल अर्जदाराने स्वतःहून गैरअर्जदार क्र. १ यांच्याशी लग्नाची तयारी दर्शविली असल्याने त्यांचा विवाह निश्चित करण्यात आला होता. लग्नानंतर जेव्हा अर्जदार सामनेवाली १ कडे नांदण्यास आली त्यावेळी गैरअर्जदार क्र. १, त्यांचे आई–वडिल (गैरअर्जदार क्र. २ व ३) मोठा भाऊ हेमंत त्याची पत्नी कावेरी (गैरअर्जदार क्र. ४ व ५) व त्यांची मुलगी सिद्धी असे एकत्र कुटुंबात राहत होते. लग्नानंतर जेव्हा अर्जदार या गैरअर्जदार यांचे एकत्र कुटुंबात नांदण्यास आली त्यावेळी घोडे दिवस त्या व्यवस्थित राहील्या परंतु कालांतराने त्यांनी त्यांना घरातील कामात स्वारस्य नसल्याचे सांगून घरातील कोणतेही काम करणार नाही असे ठामपणे सांगितले. अर्जदार हीचे लग्नाचे वेळी एफ. वाय. बी.

कॉम चे शिक्षण घेत होत्या. त्यामुळे गैरअर्जदार याने लग्नानंतर अर्जदारास तिचे अपुर्ण शिक्षण पुर्ण करण्यासाठी के.टी.एच.एम. कॉलेज गंगापूर रोड, नाशिक येथे वाणिज्य शाखेत प्रवेश घेवून दिला. तसेच अर्जदारास तिच्या शिक्षणाशी संलग्न असे कोचिंग तसेच कॉम्प्युटर क्लासेस लावून दिले. अर्जदाराचे सर्व शैक्षणिक व क्लासेस याचा संपुर्ण खर्च गैरअर्जदार यांनी केलेला आहे. अर्जदारास भाची या नात्याने गैरअर्जदार यांनी सदैव पाठींबा देण्याचा प्रयत्न केला परंतु अर्जदार या कॉलेज अथवा क्लासेसचे कारणे सांगुन काहीही माहीती न देता तासनतास घराबाहेर राहत असे तसेच वेळी अवेळी घरी परतत असे. अर्जदारास गैरअर्जदार यांनी विचारणा केली असता अर्जदार या काहीही विचार न करता सामनेवाले यांचा अपमान करून त्यांना शिवीगाळ करीत असे. तसेच अर्जदार या जेव्हा घरी असत त्यावेळी त्या दिवसभर त्यांचे खोलीत बसून तासनतास आई व बहिर्णीशी मोबाईलवर गप्पा मारत असे. गैरअर्जदार क्र. १ चे आईने तिला थोडे घरकामात लक्ष घाल असे सांगितले असता त्या गैरअर्जदार क्र. १ यांचे आईस उलट उत्तरे देत असे परंतु गैरअर्जदार क्र. ३ या तिचे वर्तनाकडे दुर्लक्ष केले. अर्जदार व गैरअर्जदार क्र. १ हे एकमेकांचे अत्यंत जवळचे नातेवाईक म्हणजेच आत्येभाऊ व मामेबहीण असल्यामुळे अर्जदाराचे गर्भास जेनेटीक अडचण निर्माण झाली व गर्भास किडनीचा आजार असल्याचे निष्पन्न झाले त्यामुळे पहीले अपत्य हे जन्मतःच मृत पावले असे कथन केले आहे.

०८. गैरअर्जदारांनी पुढे असे कथन केले आहे की, काही कालावधीनंतर अर्जदाराचे चेहरा व हातपाय यावर सुज येत असल्याचे सामनेवाले यांच्या लक्षात आले. त्यामुळे गैरअर्जदार यांनी अर्जदाराच्या सर्व ब्लड टेस्ट करवून घेतल्या. सदरील ब्लड टेस्ट चे रिपोर्टवर अर्जदारास थायरॉईड हा आजार झाल्याचे निष्पन्न झाले. गैरअर्जदार यांनी नाशिक येथील प्रसिद्ध थायरॉईड स्पेशालिस्ट डॉ. समिर

चंद्रात्रे यांचेकडून अर्जदारावर योग्य ते उपचार स्वखर्चाने केलेले आहेत.

०९. गैरअर्जदारांनी पुढे असे कथन केले आहे की, गैरअर्जदार यांनी मुलगा आरूष याच्या उज्वल भविष्याच्या व उत्कृष्ट शिक्षणाच्या उद्देशाने अर्जदारास सर्वप्रकारे नांदविण्यासाठी प्रयत्न करणे चालु ठेवले. परंतु अर्जदाराने गैरअर्जदार यांना विश्वासात न घेता मुलगा आरूष यास परस्पर किलबिल शाळेतून काढून घेवून जबरदस्तीने बोडींग स्कुलमध्ये दाखल केले. सदरील बाब ज्यावेळी गैरअर्जदार यांना समजली त्यावेळी अर्जदाराने तिचे अर्जाचे विनंती कलमात ज्या काही मागण्या केलेल्या आहे त्या खोट्यात शिरून कोर्टाची दिशाभुल करून केवळ सहानुभूती मिळविण्यासाठी केलेल्या आहेत. अर्जदार या स्वतः ची दैनंदिन उपजिवीका करण्यास समर्थ आहेत. त्यामुळे अर्जदार यांनी स्वच्छ हाताने सदरील अर्ज कोर्टात दाखल केलेला नाही. वरील सर्व परिस्थिती वरून अर्जदाराने मे. कोर्टाची सहानभूति मिळविण्यासाठी सदरील अर्ज दाखल केलेला असल्यामुळे अर्जदाराचा सदरील अर्ज हा खर्चासह फेटाळण्यात यावा अशी विनंती केली आहे.

१०. अर्जातील कथनांवरुन खालील विचाराधीन प्रश्न माझे अवलोकनार्थ येउन त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसेवरुन दिले ते खालील प्रमाणे :

| अ.कं. | विचाराधीन प्रश्न | निष्कर्ष |
|---|---|---|
| ०१ | अर्जदार हीने तिच्यावर कौटुबिक हिंसाचार झालेची बाब प्रथमदर्शनी सिध्द केली आहे काय ? | **होकारार्थी.** |
| ०२. | अर्जदार हे अंतरिम पोटगी मिळण्यास पात्र आहे काय ? असल्यास किती ? | **अंशतः होय . अर्जदार क्र. १ यांना रक्कम रुपये ३,०००/– व** |

| | | |
|---|---|---|
| | | **अर्जदार क्रं. २ ला रक्कम रुपये प्रत्येकी २,०००/- एकत्रीत रक्कम रुपये ५,०००/- प्रतिमाह.** |
| ०३. | आदेश काय ? | **अर्ज अंशतः मंजूर .** |

:: **कारणमिमांसा** ::

**११.** अर्ज व जबाब वाचला. अभिलेखावर दाखल कागदपत्र पाहिले. अर्जदार व गैरअर्जदार यांचे विधिज्ञांचा युक्तिवाद श्रवण केला.

**विचाराधीन प्रश्न क्रं. १** :-

**१२.** जरी, अर्जातील कथने ही पुराव्यांती शाबीत होणार असली तरी, भारतीय संस्कृतीनुसार कोणतीही स्त्रीस त्रास असल्या शिवाय आपल्या पतीच्या नातेवाईकां विरुध्द विनाकारण आरोप करणार नाही व सदरचे आरोप देखील प्रथमदर्शनी कौटुंबीक हिंसाचाराच्या संज्ञेत मोडणारी आहेत.

**१३.** अर्जदार यांनी गैरअर्जदार यांच्याकडुन झालेल्या वादातीत कौटुंबिक हिंसाचाराबाबत विस्तृतपणे शपथेवर कथन केले आहे. त्यामध्ये गैरअर्जदार यांच्याकडुन अर्जदारास मानसिक त्रास देणे, शंका उपस्थीत करणे, शिवीगाळ करणे याबाबतची कथने त्यांनी नमुद केलेली आहेत. कौटुंबिक हिंसाचारापासुन महिलांचे संरक्षण कायदा, २००५, कलम ३ मध्ये दिलेल्या व्याख्या लक्षात घेता, तसेच सदर कायद्याचे ध्येय व कारणांचा विचार करता प्रथमदर्शनी अर्जदार पिडीत व्यक्ती असल्याचे दिसुन येते. करीता, **विचाराधीन प्रश्न क्रं.१ चे उत्तर होकारार्थी** देण्यात येत आहे.

**विचाराधीन प्रश्न क्रं. २ करीता** :-

**१४.** अर्जदार यांनी असे कथन केले आहे की, मुख्य अर्जाचा निकाल लागण्यास अवधी लागणार आहे. त्यांच्याकडे उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही. गैरअर्जदारांनी त्यांच्या पालनपोषणाची कोणतीही व्यवस्था केली नाही. करीता, अर्जदाराने स्वतःकरीता व मुलाकरीता दरमहा रुपये २०,०००/–व घरभाडे अंतरीम अर्थसहाय्य मंजुर होण्यास विनंती केली आहे.

**१५.** विचाराधीन प्रश्न क्रं.१ च्या निष्कर्षावरुन अर्जदाराने प्रथमदर्शनी त्या पिडीत व्यक्ती असल्याचे शाबीत केलेले आहे. त्यामुळे, अर्जदार मागणी प्रमाणे अंतरिम आदेश मिळण्यास पात्र आहे किंवा नाही हे पाहणे गरजेचे आहे. आजरोजी गैरअर्जदार यांनी स्वतःचे मालमत्ता व दायित्व शपथपत्र अभिलेखावर दाखल केलेले नाही. अर्जदाराने गैरअर्जदाराकडे शेती असल्याचे कथन केले आहे मात्र उत्पन्नाबाबत कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही. अभिलेखावरील दाखल कागदपत्रांवरुन दिसून येते की, गैरअर्जदार यांच्याकडुन अर्जदार हीचा कौटुंबिक हिंसाचार झालेला आहे. त्यामुळे, निश्चितच कायदयातील स्थापित तत्वाव्दारे तिला सांभाळण्याची आर्थिक व नैतिक जबाबदारी गैरअर्जदार यांचेवर आहे. मुळ अर्जाचा निकाल होण्यास अवधी लागणार असल्याने, कौटूंबिक हिंसाचारापासुन महिलांचे संरक्षण अधिनियम, २००५, कलम २३ अन्वये अंतरिम आर्थिक सहाय्याचा आदेश अर्जदाराच्या लाभात करणे न्यायोचित होईल.

**१६.** सदर कायद्याचे कलम २३ अन्वये या न्यायालयास अंतरिम किंवा एकतर्फा आदेश देण्याचे अधिकार प्रदान करण्यात आलेले आहेत. अर्जदार हिने गैरअर्जदारची मौजे मातोरी ता.जि. नासिक येथे बागायती शेतजमीन असुन त्यामध्ये द्राक्षबाग, गहु, भाजीपाला यासारखी नगदी पिके घेतात. सदर

व्यवसायापासुन सदर १५ ते २० लाख रूपये वार्षिक उत्पन्न मिळत आहे. तसेच गैरअर्जदारचे एकत्र कुंटूबाचे सातपुर नासिक येथे साईरेखा मसाला वन या नांवाने हॉटेल व्यवसाय लॉजिंग आहे, तसेच रेशीमकाठी यानांवाने लॉन्स मंगल कार्यालय आहे तसेच पेट्रोलपंप भाडे कराराने दिलेले आहे या सर्व व्यवसायापासुन गैरअर्जदारस दरमहा रू ३० ते ४० लाख रूपये उत्पन्न मिळते गैरअर्जदारचा रविवार कांरजा नासिक येथे पांडुरंग गोपाळ पवार किराणा यानांवाने व्यवसाय असुन त्यापासुन दरमहा रू २ ते ३ लाख रूपये उत्पन्न मिळते असे कथन केले आहे. मात्र त्या बाबत अर्जदाराने कोणताही कागदोपत्री पुरावा अभिलेखावर दाखल केलेला नाही. उपरोक्त विवेचणांवरून अर्जदार यांना आर्थिक सहाय्य करण्याची गैरअर्जदार क्रं. १ यांची  कायदेशिर व नैतिक जबाबदारी आहे. अर्जदारांचे राहणीमान, सध्याचे जीवनावश्यक वस्तुंचे बाजारभाव, वैदयकीय खर्च लक्षात घेता, व सध्याचे रोजमजुरीचे दर दिवसाला रुपये ३०० ते ५०० असल्याने व **गैरअर्जदार क्रं. १ यांनी नि. क्र. २२ वर दिनांक ०१/०४/२०२६ रोजी अर्जदारास पाच हजार रक्कम प्रतिमहा खावटी देउ शकतो असे कथन केले आहे.** त्यामुळे तो महिन्याला अर्जदार क्रं. १ हिला रुपये ३,०००/– व अर्जदार क्रं. २ ला दरमहा रुपये २,०००/– अंतरीम आर्थिक सहाय्याचा हुकूम हा अर्ज दाखल दिनांकापासुन मंजुर करणे न्यायोचित आहे. परिणामी, **विचाराधीन प्रश्न  क्रं.२ चे उत्तर अंशतः होकारार्थी** देत आहे व म्हणुन मी **विचाराधिन प्रश्न क्र.३** चे उत्तरा करीता खालील आदेश पारीत करत आहे.

**– आ दे श –**

| | |
|---|---|
| (१) | अर्ज अंशतः मंजूर करण्यात येतो. |
| (२) | गैरअर्जदार क्रं. १ यांनी अर्ज दाखल दिनांकापासुन अर्जदार क्रं. १ ला  रक्कम रुपये ३,०००/– (अक्षरी रक्कम रुपये तिन हजार) व अर्जदार क्रं. २ ला  रक्कम |

| | |
|---|---|
| | २,०००/- (अक्षरी रक्कम रुपये दोन हजार)एकूण रक्कम ५,०००/- (अक्षरी रक्कम रुपये पाच हजार ) दरमहा अंतरीम आर्थिक सहाय्य म्हणून दिनांक ०६/०१/२०२४ ते मुळ अर्जाचा अंतिम निकाल होई पावेतो द्यावेत. |
| (३) | सदर आदेशाची प्रत उभयपक्षांना मोफत देण्यात यावी. |

Digitally signed by SUMIT SURESHCHANDRA CHHALLANI
Date: 2026.04.29 17:12:56 +0530

**दिनांक –२९/०४/२०२६** **(एस. एस. छल्लाणी)**
**ठिकाण – चांदवड.** **प्रथमश्रेणी न्यायदंडाधिकारी चांदवड.**

**प्रमाणपत्र**

मी अधिकथन करतो की, या पी.डी.एफ. करुन अपलोड केलेल्या न्यायनिर्णयामधील शब्द–नि–शब्द हे मूळ न्यायनिर्णयाप्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | :– | ***नामदेव एम. शेडगे,***<br>लघुलेखक (श्रेणी–३) |
| न्यायालयाचे नाव | :– | न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग (न्या.क्र.१), चांदवड. |
| न्यायनिर्णयाची तारीख | :– | २९/०४/२०२६ |
| न्यायनिर्णयावर पीठासीन अधिकारी यांनी स्वाक्षरी केल्याची तारीख | :– | २९/०४/२०२६ |
| न्यायनिर्णय अपलोड केल्याची तारीख | :– | २९/०४/२०२६ |